महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा घोडविंदे (एम.डी.)

मंगळवार ■ १४ ऑक्टोबर २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक : १११ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये

# जिल्हा परिषदेच्या ५३ सदस्य (गट) साठी आरक्षण सोडत जाहीर

# ५३ पैकी २७ जागांवर महिलांना संधी !



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** ठाणे जिल्हा परिषद सदस्य पदाच्या आरक्षण सोडतीचा कार्यक्रम सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन मध्ये पार पडला. यामध्ये ५३ पैकी २७ जागांवर महिला आरक्षण जाहीर झाले आहे. अनुसूचित जाती महिलांसाठी २, अनुसूचित जमाती ७ आणि नागरिकांचा मागास प्रवर्गासाठी ७ आणि सर्वसाधारण प्रवर्गासाठी ११ जागांवर महिला आरक्षण असणार आहे. गेल्या महिन्यात ठाणे जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदाचे आरक्षण सर्वसाधारण महिला प्रवर्गासाठी जाहीर करण्यात आले. त्यानंतर तीन ते चार दिवसांपूर्वी पंचायत समित्यांच्या सभापती पदांचे आरक्षण जाहीर झाले. यामध्ये शहापूर पंचायत समितीचे सभापती पद अनुसूचित जमाती (एसटी) प्रवर्गासाठी, मुरबाडचे सभापती पद सर्वसाधारण प्रवर्गासाठी, कल्याण पंचायत समितीचे सभापती पद नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गासाठी, भिवंडीचे सभापती पद अनुसूचित जमाती महिला प्रवर्गासाठी आणि अंबरनाथ पंचायत समितीचे सभापती पद सर्वसाधारण महिला प्रवर्गासाठी राखीव ठेवण्यात आले आहे.

त्यापाठोपाठ आता, सोमवारी ठाणे जिल्हा परिषदेच्या ५३ सदस्य (गट) साठी आरक्षण सोडत जाहीर करण्यात आली. यामध्ये ५३ जागांपैकी २७ जागांवर महिला आरक्षण जाहीर करण्यात आले आहे. यात, अनुसूचित जातीच्या तीन जागांपैकी २ जागांवर महिला, अनुसूचित जमातीच्या १३ जागांपैकी ७ जागांवर महिला, नागरिकांचा मागास प्रवर्गातील १४ जागांपैकी ७ जागांवर महिला आणि सर्वसाधारण २३ जागांपैकी ११ जागांवर महिला आरक्षण जाहीर करण्यात आले आहे.

**कल्याण पंचायत समितीमधील निर्वाचक गण निहाय आरक्षणाचा तपशील**

| अ.क्र | तालुका | निवडणूक विभाग क्रमांक व नाव | निर्वाचक गणाचा क्रमांक व नाव | आरक्षण |
|---|---|---|---|---|
| १ | कल्याण | २४- खडवली | ४७- खडवली | नागरिकांचा मागासप्रवर्ग महिला |
| २ | | | ४८-नडगांव दानबाव | सर्वसाधारण महिला |
| ३ | कल्याण | २५ - घोटसई | ४९ - राये | नागरिकांचा मागास प्रवर्ग |
| ४ | | | ५० - घोटसई | सर्वसाधारण महिला |
| ५ | कल्याण | २६-कांबा | ५१- कांबा | सर्वसाधारण महिला |
| ६ | | | ५२- म्हारळ (क) | सर्वसाधारण महिला |
| ७ | कल्याण | २७- म्हारळ | ५३- म्हारळ (अ) | अनुसूचित जाती |
| ८ | | | ५४- म्हारळ (ब) | सर्वसाधारण प्रवर्ग |
| ९ | कल्याण | २८-रायते | ५५- मांजर्ली | अनुसूचित जाती |
| १० | | | ५६- रायते | सर्वसाधारण प्रवर्ग |

## लक्षवेधी

## ठाण्याचा महापौर भाजपचाच ! - आ. संजय केळकर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** ठाणे महापालिका निवडणुकीच्या तोंडावर पक्ष बदलाचे वारे वाहू लागले असून या निवडणुकीत युती आणि आघाडी होणार का, याविषयी चर्चा रंगल्या आहेत. अशातच भाजपचे आमदार संजय केळकर यांनी मोठे विधान केले आहे. ठाण्याचा महापौर भाजपचा झाला पाहिजे, हिच आमच्या कार्यकर्त्यांची इच्छा आहे आणि आमचीही हीच भूमिका कायम राहीली आहे, असे मत केळकर यांनी व्यक्त केले आहे. त्यामुळे राजकीय वर्तुळात वेगवेगळ्या चर्चा रंगल्या आहेत. निवडणुका दोन्ही पक्ष स्वबळावर लढणार की महायुतीत लढणार याविषयी वेगवेळ्या चर्चा रंगल्या आहेत. त्यातच भाजपचे आमदार संजय केळकर यांनी निवडणुकीबाबत मोठे विधान केले आहे. ठाणे महापालिका निवडणुक युतीत लढाव्याची की नाही, याबाबतचा निर्णय ठाण्याचे प्रमुख नेते एकत्रित बसून निर्णय घेतील. परंतु कार्यकर्त्यांची भुमिका आणि इच्छा आहे की, स्वतंत्र लढले पाहिजे. त्याचबरोबर प्रत्येक पक्षाच्या कार्यकर्त्यांची भुमिका असते, तशीच आमचीही कायम भूमिका राहिली आहे की, ठाण्याचा महापौर भाजपचा झाला पाहिजे, हिच आमच्या कार्यकर्त्यांची इच्छा आहे, असे मत भाजपचे आमदार संजय केळकर यांनी व्यक्त केले. ठाणे महापालिकेचा कारभार स्वच्छ राहावा, यासाठी मी चोकीदार म्हणून गेली कित्येक वर्षे काम करत आहे. ही लढाई निवडणुकीच्या तोंडावर नव्हे, तर आधीपासूनच लढत आहे, असे ते म्हणाले.

## सिडकोची स्थानके मध्य रेल्वेकडे जाणार ?

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** मध्य रेल्वे मार्गावरील हार्बर मार्गिकची स्थानके व्यवसायिकांच्या आणि नोकरदार प्रवाशांच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाची आहेत. नवी मुंबईत २५ वर्षांपूर्वी सिडकोने ही स्थानके उभारली होती. या स्थानकांच्या देखभाल आणि दुरुस्तीच्या कारणांवरून सिडको आणि रेल्वे प्रशासनामध्ये वेगवेगळी मतांतरे होती. आता ही रेल्वे स्थानके मध्य रेल्वेकडे जाण्याची शक्यता असून भविष्यात या स्थानकांमध्ये आणखी काही सुधारणा होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. नवी मुंबई शहरात मोठ्याप्रमाणात राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय कंपन्यांची कार्यालये आहेत त्यामुळे ठाणे ते कर्जत, कसारा आणि मुलुंड, भांडूप, मुंबई उपनगरातील लाखो प्रवासी दररोज ठाणे रेल्वे स्थानकातून ट्रान्स हार्बर मार्गे नवी मुंबईत जातात. तसेच नवी मुंबईतून मुंबई, ठाणे शहराच्या दिशेने देखील हजारो प्रवासी येतात. ट्रान्सहार्बर आणि हार्बर मार्गावरून दिवसाला १० लाखाहून अधिक प्रवासी वाहतुक करत असतात. या स्थानकांची जबाबदारी जबाबदारी जशीच्या तशी घेण्यास सिडकोने रेल्वे प्रशासनाला कळविले. त्यामुळे या इमारतींची देखभाल आणि दुरुस्ती करुन नव्याने बांधलेल्या स्वरुपात हस्तांतरित करण्याचे रेल्वे कडून सांगण्यात आले.

**■ कोणत्या स्थानकांचा सामावेश**

वाशी पनवेल हार्बर मार्गावरील वाशी, सानपाडा, जुईनगर, नेरूळ, सीवूड, बेलापूर, खारघर, मानसरोवर, खांदेश्वर, पनवेल आणि ट्रान्स हार्बर मार्गावरील घणसोली, ऐरोली, रबाळे या स्थानकांचा सामावेश आहे. सिडको आणि रेल्वे प्रशासनामध्ये चर्चा सुरु असून स्थानकांची आवश्यक देखभाल दुरुस्ती झाल्यानंतरच मध्य रेल्वे ती स्थानके नव्या स्वरुपात स्विकारेल. सध्या विविध कारणांमुळे स्थानकांमध्ये देखभाल दुरुस्ती करणे काही प्रमाणात गरजेचे आहे. मध्य रेल्वेकडे ही स्थानके हस्तांतरित झाल्यास त्याची दुरुस्ती रेल्वेकडून होणार आहे.

## कबुतराची सुटका करताना अग्निशमन दलाच्या जवानाचा मृत्यू

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** दिवा येथील खर्डीगाव भागात उन्नत विद्युत वाहिनीमध्ये अडकलेल्या कबुतरची सुटका करण्यासाठी गेलेल्या ठाणे महापालिकेच्या अग्निशमन दलाच्या जवानाचा रविवारी सायंकाळी मृत्यू झाला. उत्सव पाटील (२८) असे मृत जवानाचे नाव असून जवान आझाद पाटील (२९) यामध्ये जखमी झाले. खर्डीगाव येथील दिवा-शीळ मार्गालगतच्या टोरंट कंपनीच्या उन्नत विद्युत वाहिनीवर एक कबुतर अडकले होते. या बाबतची माहिती ठाणे महापालिकेच्या अग्निशमन दलाच्या जवानांना मिळाल्यानंतर दिवा येथील अग्निशमन दलाचे जवान घटनास्थळी दाखल झाले. जवान उत्सव पाटील आणि आझाद पाटील हे कबुतरची सुटका करत असताना अचानक त्यांना विजेचा झटका बसला. दोघेही गंभीर जखमी झाल्याने त्यांना कळवा येथील ठाणे महापालिकेच्या छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात दाखल करण्यात आले.

## बदलापुरातील हजारो मालमत्ताधारक शास्ती माफीपासून वंचित

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**बदलापूर :** नागरिकांना थकीत मालमत्ता कर भरता यावा, यासाठी राज्य शासनाने चार महिन्यांपूर्वी अभय योजना लागू करण्याचा महत्त्वपूर्ण शासन निर्णय जारी केला आहे. मात्र, केवळ मालमत्ता कर व शास्तीबाबतचा सॉफ्टवेअरमधील डेटा उपलब्ध होत नसल्याने या शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्यात कुळगाव-बदलापूर नगरपरिषद प्रशासन अपयशी ठरले आहे. त्यामुळे बदलापुरातील हजारो मालमत्ताधारक शास्ती माफीच्या फायद्यापासून वंचित आहेत. त्याचबरोबर नगरपरिषदेचेही कोट्यवधी रुपयांचे उत्पन्न रखडले आहे.

या निर्णयानुसार ५० टक्क्यांपर्यंत शास्ती माफ करण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना तर १०० टक्क्यांपर्यंत शास्ती माफीचा अधिकार राज्य शासनाला आहे. कुळगाव-बदलापूर नगरपरिषद हद्दीत मालमत्ता कराची मागणी ८९ कोटी असून, शास्तीची रक्कमही ५८ कोटी रुपये आहे. त्यामुळे या निर्णयानंतर नगरपरिषदेच्या तिजोरीत मोठ्या प्रमाणात महसूल जमा होणे अपेक्षित होते. ही तपशीलवार माहिती 'महायूएलबी' या संगणकीय प्रणालीमध्ये संपूर्णपणे नोंदविण्यात आलेली आहे. या संगणकीय प्रणालीकरिता देखभाल व तांत्रिक सहाय्यासह कार्यान्वित करण्यासाठी शासनाने 'इनोवेव्ह' या कंपनीची नेमणूक केली आहे. मात्र, तीन वेळा स्मरणपत्रे देऊनही सदर कंपनीकडून माहिती उपलब्ध करून दिली जात नसल्याने कुळगाव-बदलापूर नगरपरिषदेतील मालमत्ता कर शास्ती माफीची अंमलबजावणी रखडली आहे. येत्या काही महिन्यांत २९ कोटी रुपयांचा मालमत्ता कर भरणा होणे अपेक्षित आहे. शास्ती माफी झाल्यास हा भरणा लवकरात लवकर होऊन नागरिकांना दिलासा मिळण्यास तसेच पालिकेचे उत्पन्न वाढण्यास मदत होणार आहे.

-----------------------------

**■ माहिती अभावी प्रस्ताव रखडले**

अभय योजनेंतर्गत शास्ती माफीचे प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर करण्यासाठी नगर परिषद हद्दीतील मालमत्तांची १९ मे पर्यंतची प्रलंबित शास्तीची घटकानुसार आवश्यक माहिती (विशेषतः वॉर्डनिहाय, मालमत्ता क्रमांकनिहाय कर आदी तपशील) तांत्रिक स्वरूपात एक्सेल फॉरमॅटमध्ये उपलब्ध होणे आवश्यक आहे.

**■ ३५ कोटींची करवसुली**

यंदाच्या कुळगाव-बदलापूर नगर परिषदेत १ एप्रिलपासून आतापर्यंत नागरिकांनी सुमारे ३५ कोटी रुपयांचा मालमत्ता कर भरणा केला आहे. त्यामध्ये १० कोटी रुपयांची शास्ती होती. जर शास्ती माफीची अंमलबजावणी झाली असती, तर ५ कोटी रुपयांची शास्ती माफ झाली असती. परंतु त्यांना या फायद्यापासून वंचित रहावे लागले आहे.

## यंदा विद्यार्थ्यांची कसोटी लवकर!



### १० वी - १२ वी बोर्ड परीक्षांच्या तारखा जाहीर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पुणे:** एकीकडे निवडणुकांची रणधुमाळी सुरू असताना दुसरीकडे दहावी (SSC)आणि बारावी बोर्डाच्या (HSC) परीक्षांच्या तारखा जाहीर करण्यात आल्या आहेत. बारावी बोर्ड परीक्षा 10 फेब्रुवारी 2026 ते 18 मार्च 2026 या कालावधीत संपन्न होणार आहे. तर दहावी बोर्ड परीक्षा 20 फेब्रुवारी 2026 ते 18 मार्च 2026 या कालावधीत होणार आहे. यंदाच्या वर्षी सुद्धा दहावी आणि बारावी बोर्डाच्या परीक्षा दोन आठवडे आधी घेण्याचा निर्णय शिक्षण मंडळाने घेतला आहे. कारण, 12 वी बोर्ड परीक्षा ही फ्रेब्रुवारी महिन्यात शेवटच्या आठवड्यात असते, तर दहावीची परीक्षा ही मार्च महिन्यात सुरू असते. मात्र, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत (Pune) घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र 12 वी आणि माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र 10 वीच्या फेब्रु-मार्च 2026 च्या परीक्षांच्या तारखांबाबत शासनाने परिपत्रक जारी केलं असून परीक्षा लवकर होत आहेत.


महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने पुणे, नागपूर, छ. संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळामार्फत आगामी फेब्रुवारी-मार्च 2026 मधील उच्च माध्यमिक प्रमाणपत्र 12 वी आणि माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र 10 वी परीक्षेच्या लेखी, प्रात्यक्षिक व इतर परीक्षा तारखांना आयोजित करण्यात आल्या आहेत. त्यानुसार, 12 वीची लेखी परीक्षा मंगळवार 10 फेब्रुवारी 2026 ते बुधवार 18 मार्च 2026 (माहिती तंत्रज्ञान व सामान्यज्ञान विषयांच्या ऑनलाईन परीक्षेसह) होणार आहे. तर, माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र 10 वीची परीक्षा कालावधी शुकवार 20 फेब्रुवारी 2026 ते बुधवार 18 मार्च 2026 रोजी घेण्यात येणार आहेतच. दरम्यान. शासनाच्या परिपत्रकानुसार 12 वी बोर्डाच्या प्रात्यक्षिक श्रेणी तोंडी व अंतर्गत मूल्यमापन तसेच व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रात्यक्षिक परीक्षा या 23 जानेवारी 2026 ते 9 फेब्रुवारी 2026 दरम्यान होणार आहेत. तर दहावी बोर्डाच्या प्रात्यक्षिक श्रेणी व अंतर्गत मूल्यमापन तसेच अंतर्गत व्यावसायिक अभ्यासक्रम प्रात्यक्षिक परीक्षा 2 फेब्रुवारी ते 18 फेब्रुवारी दरम्यान होणार आहेत.

### ■ तोंडी अन् प्रॅक्टीकल परीक्षेचीही तारीख जाहीर

**प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी व अंतर्गत मूल्यमापन तसेच NSQF अंतर्गत व्यावसायिक अभ्यासक्रम प्रात्यक्षिक परीक्षाशुकवार 23 जानेवारी 2026 ते सोमवार 09 फेब्रुवारी 2026 रोजी (माहिती तंत्रज्ञान व सामान्यज्ञान विषयांच्या प्रात्यक्षिक परीक्षेसह) सोमवार 02 फेब्रुवारी 2026 ते बुधवार 18 फेब्रुवारी 2026 (शरीरशास्त्र, आरोग्यशास्त्र व गृहशास्त्र विषयांच्या प्रात्यक्षिक परीक्षेसह) शाळा/ कनिष्ठ महाविद्यालय व विद्यार्थी यांना अभ्यासक्रमाचे नियोजन करण्याचे हेतूने तसेच विद्यार्थ्यांच्या मनावरील ताण कमी होण्याचे दृष्टीने फेब्रुवारी-मार्च 2026 परीक्षेच्या प्रात्यक्षिक व लेखी परीक्षेच्या तारखा जाहीर करण्यात आल्या आहेत. उपरोक्त परीक्षांचे विषयनिहाय सविस्तर अंतिम वेळापत्रक स्वतंत्रपणे मंडळाच्या संकेतस्थळावर यथावकाश जाहीर करण्यात येईल, असेही सांगण्यात आले आहे. महामंडळाचे सहसचिव प्रमोद गोफणे यांच्या सहीने याबाबतचे परिपत्रक जारी करण्यात आले आहे.**

JEEVANDEEP SHAIKSHANIK SANSTHA POI'S
ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE GOVELI
Tal. Kalyan, Dist- Thane 421103
Permanently Affiliated to University of Mumbai
NAAC Reaccredited "B" Grade
Admission started for Arts, Commerce, Science & Professional Courses
2025-26 ADMISSION OPEN
UNDER GRADUATE
B.A.: Marathi, English, Economic, History, Sociology, Geography, Political Science
B.Com: General
B.Com:Account & Finance
B.Sc.: Chemistry
B.Sc.: Maths
B.Sc.: Information Technology
B.Sc.: Data Science
B.A.M.M.C.: Mass Media
B.M.S.: Management Studies
POST GRADUATE
M.A.: Marathi, History, Sociology, Economic, Geography
M.Com.: Advanced Accountancy
M.Sc.: Chemistry Organic
M.Sc.: Analytical
M.Sc.: Information Technology
M.A. C & J: Mass Media
ज्ञानगंगा घरोघरी
Y.C.M.O.U. COURSES
M.Sc. (Chemistry) M.A. - Yoga
DCM - Diploma in Co-operative Management
DCA - Diploma in Computer Applications
B. lib - Library Science
MBA - In H. R., Finance, Production, Marketing
SKILL DEVELOPMENT COURSE
DMLT
Fire & Safety
Construction Supervisor
Photography
Yoga Teacher Training GDA
Nursing Course,
Tally
Tailoring,
English Speaking
Advance Beautician
Social Media
Incubation & Innovation Center
For more information : 7021995158 I 8108559566
Email - goveli_jssp@rediffmail.com
website :www.jeevandeepcollegegoveli .in

## आसनगाव : प्लास्टिक कारखान्याला भीषण आग



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर :** आसनगाव येथे प्लास्टिकच्या वस्तू बनविणाऱ्या कंपनीला भीषण आग लागल्याची घटना सोमवारी उघडकीस आली. कामगारांनी प्रसंगावधान दाखवित कंपनीबाहेर धाव घेतल्याने मोठी दुर्घटना टळली. दरम्यान, आगीमुळे कंपनी जवळजवळ जळून खाक झाली असून कंपनीचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले आहे. शहापुर नगरपंचायत, जिंदाल कंपनी, कल्याण डोंबिवली महापालिका आणि भिवंडी महापालिका येथील अग्निशमन दल तसेच स्थानिक १७ पाण्याचे टँकर घटनास्थळी दाखल झाले असून आग विझविण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरू होते. कंपनीला आग लागण्याचे नेमके कारण अद्याप समजले नसल्याचे शहापुर तहसील कार्यालयाकडून सांगण्यात आले.

दरम्यान भीषण आगीमुळे कंपनी जवळजवळ जळून खाक झाली असून कंपनीचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाल्याचे कळते आहे. आगीमुळे धुराचे लोट पसरल्याने स्थानिक नागरिक, ग्रामपंचायत, महसूल विभाग आणि पोलीस प्रशासन यांनी तात्काळ आग विझविण्याचे प्रयत्न सुरू केले. विद्युत वितरण कंपनीने सुरक्षेच्या दृष्टीने कंपनीचा वीजपुरवठा तातडीने खंडित केला होता. ही कंपनी गेल्या अठरा वर्षांपासून असून येथे प्लास्टिकच्या वस्तू बनविल्या जातात. आग नियंत्रणात आणण्यासाठी प्रयत्न सुरू असून घटनास्थळी तहसीलदार परमेश्वर कासुळे, पोलीस निरीक्षक मुकेश ढगे, नायब तहसीलदार वसंत चौधरी यांनी आपल्या पथकासह धाव घेऊन परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी प्रयत्न सुरू केले असून आगीवर नियंत्रण मिळविण्याचे कार्य सुरु असल्याचे सांगण्यात येते.





# बांधकाम ठेकेदारामुळे आदिवासींना प्यावे लागत होते अशुद्ध गढूळ पाणी !

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**झिडके-अंबाडी:** भिवंडी तालुक्यातील मौजे-खंबाळा ग्रामपंचायत कार्यक्षेत्रातील आदिवासी वस्तीमध्ये रस्त्याचे खोदकाम करणाऱ्या ठेकेदाराकडून आदिवासी वस्तीतील पाणीपुरवठा पाईप लाईन तोडल्याने सदर पाईप लाईन मधून अशुद्ध व गाळयुक्त गढूळ पाणीपुरवठा होऊ लागला. त्यामुळेच या ठिकाणी पिण्याचे व दैनंदिन वापरातील पाणीपुरवठ्याचा दुसरा काहीच पर्याय उपलब्ध नसल्याने येथील लोकवस्तीतील रहिवाशांना अशुद्ध व गाळयुक्त गढूळ पाणी वापरायची वेळ आली.याबाबत सदर आदिवासी वस्तीतील संतप्त रहिवाशांनी गढूळ पाण्याने भरलेला हंडा व कळशी डोक्यावर घेऊन ग्रामपंचायत कार्यालयात आपला मोर्चा काढला.व आपल्या मागण्या मान्य झाल्याखेरीज येथून हटणार नाही अशी आक्रमक भूमिका मोर्चेकऱ्यांनी घेतल्यावर ग्रामपंचायत सरपंच व सदस्यांनी पडघा पोलीस यांना पाचारण करून,संबंधित बाबतीत बांधकाम ठेकेदाराकडून झालेल्या अन्यायाबाबत माहिती दिली असता,पोलिसांनी वस्तुस्थिती पाहून सदर आदिवासी वस्तीतील पाणीप्रश्न व त्याबाबत तात्काळ पर्याय व्यवस्था करावी अन्यथा ठेकेदार म्हणून आपल्यावर गुन्हा दाखल करण्यात येईल असे स्पष्ट सांगितल्यानंतर ठेकेदाराकडून सदर आदिवासी वस्तीसाठी फुटलेल्या पाईप लाईनची दुरूस्ती होईपर्यंत टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्याची हमी घेतल्यावर मोर्चेकरी यांनी सरपंच समक्ष लेखी घेऊन आपली समजूतीची भूमिका घेऊन आपल्या प्रश्नाची सोडवणूक केली.

सदर मोर्चामध्ये आदिवासी वस्तीतील विनोद गावीत,महेश भूरकूड,काकरी जाधव,अनिल बरफ,गुलाब मोरे,गीता वळवी,अलिशा बरफ आदि रहिवाशांचा सहभाग होता.त्यांना या अन्यायकारक घटनेबाबत मार्गदर्शन जेष्ठ सामाजिक कार्यकर्त्या पार्वती पवार,शेवंती पासारी यांचे लाभले. या अन्यायकारक घटनास्थळी विशेष दखल घेण्यासाठी श्रमजीवी संघटनेचे भिवंडी तालुका सचिव-विश्वनाथ पासारी उपस्थित राहून,मोर्चेकरी यांना सक्रीय पाठिंबा व योग्य न्याय मिळवून देण्याच्या कामी आपली भूमिका पार पाडली.

# भ्रष्टाचाऱ्यांना पाठीशी घातल्यास अधिकाऱ्यांच्या तोंडाला काळे फासणार

## भ्रष्टाचार , लाचखोरी विरोधात काँग्रेसचा पत्रकार परिषदेत इशारा

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**दि.13 ऑक्टो.(प्रतिनिधी):**

उच्च न्यायालयाच्या दणक्यानंतर ठाणे शहरातील अनधिकृत बांधकामांवर सुरू केलेली कारवाई थंडावली असुन ठाणे महापालिका प्रशासन ठाणेकरांची फसवणुक करीत आहे. असा घणाघाती आरोप काँग्रेसचे ठाणे शहर - जिल्हाध्यक्ष विक्रांत चव्हाण यांनी पत्रकार परिषदेत केला. आता तर उपायुक्त शंकर पाटोळे लाच प्रकरणाने पालिकेच्या अतिक्रमण विभागातील भष्टाचार चव्हाट्यावर आला असल्याने अशा भ्रष्ट अधिकाऱ्यांना प्रशासनाने पाठीशी घातल्यास अधिकाऱ्यांच्या तोंडाला काळे फासण्याचा इशारा काँग्रेसने दिला आहे.

ठाणे महापालिकेत बोकाळलेला भ्रष्टाचार आणि लाचखोरी विरोधात काँग्रेसने सोमवारी पत्रकार परिषद घेतली. या पत्रकार परिषदेला शहर अध्यक्ष विक्रांत चव्हाण यांच्यासह मुख्य प्रवक्ते राहुल पिंगळे, हिंदुराव गळवे आदिंसह काँग्रेसचे पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी बोलताना अध्यक्ष विक्रांत चव्हाण यांनी, या लाचखोर पाटोळेच्या कारनाम्यांचा पर्दाफाश सर्वप्रथम काँग्रेसनेच केला होता. याची आठवण करून दिली. तसेच, उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर ठाण्यात सुरु झालेली अनधिकृत बांधकामांवरील कारवाई का थांबली ? असा सवाल चव्हाण यांनी केला. संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाचा भाग असलेल्या येऊरच्या पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील क्षेत्रात शहर विकास विभागाने दिलेल्या परवानग्या नियमबाह्य आहेत. प्रशासनाने अनधिकृत बांधकामाची शास्ती माफ केली आहे. याबरोबरच अनधिकृत बांधकाम चौकशी प्रकरणी न्यायालयाने महापालिकेला विचारलेल्या १९ प्रश्नांना प्रशासनातील भ्रष्ट अधिकाऱ्यांनी थातुर मातुर उत्तरे देऊन पळवाटा शोधल्याचा आरोप ठाणे काँग्रेसचे अध्यक्ष विक्रांत चव्हाण यांनी केला आहे. तेव्हा, पालिकेतील भ्रष्ट अधिकाऱ्यांना पाठीशी घातल्यास त्या अधिकाऱ्यांच्या तोंडाला काळे फासण्याचा इशारा काँग्रेसने दिला आहे .

**लाचखोर पाटोळेला बडतर्फ करा - जिल्हाध्यक्ष विक्रांत चव्हाण**

२५ लाख रुपयांची लाचप्रकरणी अटकेत असलेला ठाणे महापालिकेचा लाचखोर निलंबित उपायुक्त शंकर पाटोळे याच्या चौकशीवर सत्र न्यायालयाने कडक ताशेरे ओढले आहेत. त्यामुळे लाच प्रकरणातील त्यांचे कॉल रेकॉर्डिंग आणि व्हॉट्सअ‍ॅप कॉल डिटेल्स देखील तपासले गेले पाहिजेत. तसेच एसीबीने पाटोळे यांच्या मालमत्तेची चौकशी करण्याबरोबरच पाटोळेच्या नातेवाईकांची देखील ईडी मार्फत चौकशी करावी, जेणेकरून भ्रष्टाचाराच्या मार्गाने किती माया जमवली याचा हिशोब उघड होऊन पाटोळेला अभय देणारे महापालिकेतील अधिकारी व राजकीय पुढारी यांचीही नावे समोर येतील. निलंबनाऐवजी पाटोळेला सेवेतून बडतर्फ करावे अशी मागणी काँग्रेस करणार असुन मागणी मान्य न झाल्यास जनहित याचिका दाखल करणार असल्याचे चव्हाण यांनी सांगितले आहे.



# पडघा - खडवली रस्ता दुरुस्त करण्याची नागरीकांची मागणी

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पडघा दि.१३ (प्रतिनिधी)**

भिवंडी व कल्याण सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत असलेल्या व रात्रंदिवस वाहनांची वर्दळ असलेल्या व खड्डयामुळे खराब झालेल्या पडघा खडवली रस्त्याची दुरूस्ती करण्याची मागणी नागरीकांनी केली आहे. मुंबई व उपनगरात विविध कामासाठी मध्य रेल्वेच्या खडवली स्टेशनकडे व मुबंई नाशीक महामार्गावरील खडवली फाट्यावरून टिटवाळा मार्गे गोवेली, मुरबाड, कल्याण अंबरनाथ बदलापूरकडे कर्जत कडे जाणाऱ्या या रस्यावर वाहनांची रात्रंदिवस वर्दळ असते. हजारो चाकरमानी, विद्यार्थी, व्यावसायिक, कामगार या रस्त्यावरुन चारचाकी, दुचाकी, एसटी बसेस, प्रवाशी ऑटोरिक्षा मार्फत प्रवास करतात. मात्र पडघा - खडवली रस्त्यावर पावसाळ्या अगोदर पासून भिवंडी हद्दीतील खडवली फाटा, आन्हे, आन्हे पाडा, सोर येथे व कल्याण हद्दीतील भातसा नदीवरील पुलाजवळील वळणावर खड्डे पडले असुन काही ठिकाणी रस्ता पुर्णपणे उखडला आहे तर काही ठिकाणी तर गतीरोधकाच्या दोन्ही बाजूला खड्डे पडले असुन, आन्हे पाडा येथे गणपती मंदिर समोर रस्त्याच्या एका बाजुला खुप खड्डे पडल्याने वाहन चालकांना तारेवरची कसरत करावी लागत आहे.

तसेच अनेक वेळा रहदारीही जाम होत असते. त्यामुळे वाहनचालकांना त्रास सहन करावा लागत आहे तसेच रात्रीच्या वेळी खड्डयामुळे अपघाताची भिती व्यक्त करण्यात येत आहे. त्यामुळे पडघा खडवली रस्ता भिवंडी, कल्याण सार्वजनिक विभागाने लवकर दुरुस्त करावा अशी मागणी नागरिकांकडुन होत आहे.

# २७ गावांतील कर वसुली व जप्ती तात्काळ थांबविण्याची मागणी

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** २७ गावांमध्ये कल्याण डोंबिवली महानगरपालिके मार्फत होत असलेली नियमबाह्य व बेकायदेशीर सक्तीची कर वसुली व जप्ती तात्काळ थांबविण्याची मागणी सर्व पक्षीय हक्क सरंक्षण संघर्ष समितीने केडीएमसी आयुक्तांकडे केली आहे. याबाबत समितीने आयुक्तांची भेट घेऊन निवेदन दिले असून या मागणीबाबत आयुक्तांनी सकारात्मकता दर्शवली आहे. यावेळी समितीचे उपाध्यक्ष सुमित वझे, सत्यवान म्हात्रे, दत्ता वझे, मधुकर माळी, संदीप पालकरी, राहुल जाधव आदी पदाधिकारी उपस्थित होते.

सर्व पक्षीय हक्क संरक्षण संघर्ष समिती (रजि.) ही गेली ४२ वर्षे २७ गावातील जनतेच्या न्याय हक्काकरीता लढा देत आलेली आहे व आता ही एकमेव संघर्ष समिती खासदार सुरेश म्हात्रे यांच्या नेतृत्वामध्ये हे कार्य अगदी ताकदीने व कायद्याला अनुसरून पार पाडत आहे. जसे नियमित कर भरणे हे एका दक्ष नागरिकाचे कर्तव्य आहे तसेच ज्याकरिता ही कर आकारणी होत असते त्या सर्व सुविधा अखंडित पणे पुरविणे ही महानगरपालिकेची जबाबदारी असते. व या महानगरपालिकेच्या सोई सुविधा या २७ गावांमध्ये पुरविण्याच्या कर्तव्यात केडीएमसीने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अन्वये कसूर केले असल्याचे पुराव्यानिशी प्रकरणे हे समिती पर्यंत जनतेमार्फत आलेली आहे.

त्यामुळे असे असताना केडीएमसीने सुरू केलेली सक्तीची कर वसुली व जप्ती ही पूर्णतः बेकायदेशीर आहे. ही नियमबाह्य वसुली व जप्ती करून २७ गावातील लोकांकडून खंडणी वसूल करण्यासारखी आहे. याचा समितीच्या वतीने निषेध व्यक्त करण्यात आला. २७ गावातील लोकांना कल्याण डोंबिवली महानगरपालिकेमध्ये राहायचे नाही व तसे प्रयत्न न्यायालय व शासन दरबारी संघर्ष समिती करत आहे. कर वसुली करिता जोवर नियमान्वये सुविधा या २७ गावातील जनतेला मिळत नाही तोवर ही जीजिया कर वसुली व जप्ती तात्काळ थांबवावी अन्यथा यापुढे याचे परिणाम हे गंभीर होतील असा इशारा समितीच्या वतीने आयुक्तांना देण्यात आला.

तसेच यामुळे २७ गावातील जनतेला जो मानसिक त्रास होईल किंवा काही जीवितहानी घडल्यास त्यास पूर्णतः पालिका जवाबदार असेल असे आयुक्तांना निवेदन देण्यात आले असून आयुक्तांनी याबाबत सकारात्मकता दर्शवली असल्याची माहिती समितीच्या वतीने देण्यात आली.



# जिल्हा परिषद शिक्षक नवनाथ शिंदे यांचा निरोप समारंभ

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**वाडा :** वाड्यापासून साधारणतः 18 किमी असलेल्या वाघोटे ह्या एका छोट्याशा गावामध्ये ग्रामस्थांनी एका शिक्षकासाठी आयोजित केलेला हा निरोप समारंभ अतिशय अद्वितीय असा होता. आगमनाला शिक्षक आणि त्यांच्या संपूर्ण परिवारावरती पुष्पवृष्टी करून सगळ्या ग्रामस्थांनी त्यांचे सहर्ष स्वागत केले. सर्व उपस्थितांच्या स्वागतानंतर विद्यार्थ्यांनी सरांविषयीचे आपले मनोगत साश्रूनयनांनी व्यक्त केले, त्यातून त्या विद्यार्थ्यांचे शिक्षकाविषयी असलेले प्रेम, आपुलकी जाणवत होती. ग्रामस्थ राजेंद्र भोईर, कशिष कौले, बालवाडीच्या जाधव मॅडम, शिक्षिका अश्विनी दळवी यांनी भावनिक होत सरांविषयी गुणगान गात आपल्या भावना व्यक्त केल्या. शिंदे सरांनी सहकुटुंब उपस्थित राहत दहा वर्षे जी सेवा दिली, ग्रामस्थांसाठी, विद्यार्थ्यांसाठी जे उपक्रम राबवले त्या सर्व गोष्टींना आपल्या वाणीतून उजाळा दिला. जवळपास दोन तास चाललेल्या या कार्यक्रमात उपस्थित सर्वच जण भावुक होते. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित सामाजिक कार्यकर्ते कल्पेश ठाणगे यांनी सरांचं शिक्षण, लेखन, व्याख्यान इत्यादी विविध क्षेत्रातील शाळाबाह्य योगदानावरती प्रकाश टाकला.

एक आदर्श शिक्षक कसा असावा हे ग्रामस्थांच्या भावनांतून दिसत होते. शाळा जरी छोटी असली तरी सगळ्या ग्रामस्थांनी एकत्र येऊन सरांना हा दिलेला निरोप अतिशय अप्रतिम असा होता. निरोप समारंभानंतर सगळ्यांना खाऊ वाटप करून कार्यक्रमाचा शेवट गोड झाला.

# आपत्ती धोके निवारण दिनानिमित्त नमुंमपामार्फत विशेष कार्यक्रम

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

13 ऑक्टोबर हा दिवस संपूर्ण जगभरात जागतिक आपत्ती धोके निवारण दिन म्हणून साजरा करण्यात येतो. या दिनाचे औचित्य साधून आपत्ती निवारणाबाबत जागरुकता निर्माण करण्यासाठी महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली जागतिक आपत्ती धोके निवारण दिन विविध उपक्रमांच्या माध्यमातून साजरा करण्यात आला. महापालिका मुख्यालयातील ज्ञानकेंद्रामध्ये अतिरिक्त आयुक्त श्री. सुनिल पवार यांच्या नियंत्रणाखाली आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाप्रसंगी आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या उपायुक्त श्रीम. ललिता बाबर, महापालिका सचिव श्रीम. चित्रा बाविस्कर, शिक्षण विभाग उपायुक्त श्रीम. संघरत्ना खिल्लारे, विभाग कार्यकारी अभियंता श्री. प्रवीण गाडे, सुरक्षा अधिकारी श्री. रामचंद्र वारे आदी मान्यवर उपस्थित होते.

# पेण पंचायत समितच्या १०जागांसाठी आरक्षण जाहीर

## महिलांमध्ये चुरशीची लढत

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पेण (प्रतिनिधी)**

जिल्हा परिषद पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२५ साठी आज उपविभागीय अधिकारी पेण कार्यालयात पेण पंचायत समितीच्या एकुण १० गणांसाठी प्रांत अधिकारी प्रविण पवार यांचे अध्यक्षतेखाली व पेण तहसीलदार तानाजी शेजाळ ,नायब तहसीलदार नितीन परदेशी निवासी नायब तहसीलदार प्रसाद कालेकर यांचे प्रमुख उपस्थितीत आरक्षण सोडत चिठ्ठी टाकून विद्यार्थीनीच्या हस्ते काढण्यात आली. विशेष म्हणजे आरक्षणात पेण पंचायत समिती सभापती पद हे महिला सर्वसाधारण खुला गट असल्याने आजच्या आरक्षण सोडतीत डोलवी,रावे,वडगाव या तीन पंचायत समिती गणात सर्वसाधारण महिला आरक्षण पडल्याने सभापती पदाच्या मानसन्मानासाठी महिलांमधे चुरस पहायला मिळणार हे निश्चित झाले आहे.

आज संपन्न झालेल्या आरक्षण सोडती नुसार जिते पं.स.गणात,सर्वसाधारण खुला प्रवर्ग ,वाकरुळ गणात अनुसूचित जमाती महिला ,रावे गणात सर्वसाधारण महिला,दादर गणात नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला,वाशी गणात सर्वसाधारण, वडखळ गणात सर्वसाधारण. महल मिरा डोंगर गणात अनुसूचित जमाती. वडगांव गणात सर्वसाधारण महिला , डोलवी गणात,सर्वसाधारण महिला आणि शिहू गणात नागरिकांचा मागास प्रवर्ग अशा दहा जागांचे आरक्षण जाहीर झाले आहे. सभापती पद हे महिलांसाठी राखीव असल्याने रावे,डोलवी, वडगाव या तीन मतदार संघात महिलांच्या लढतीची चुरस पहावयास मिळेल.

# 78 व्या निरंकारी संत समागमासाठी स्वयंसेवकांकडून व्यापक पूर्वतयारी




**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** संत निरंकारी मिशनचा 78 वा वार्षिक संत समागम, गतवर्षांच्या दिव्यता आणि गौरवशाली परंपरेशी सुसंगत राहून, या वर्षीही 31 ऑक्टोबर ते 3 नोव्हेंबर, दरम्यान संत निरंकारी आध्यात्मिक स्थळ, समालखा (हरियाणा) येथे अत्यंत भव्यरूपात, श्रद्धापूर्ण आणि आध्यात्मिक उत्साहात साजरा होणार आहे. हा दिव्य सोहळा सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज आणि निरंकारी राजपिता रमितजी यांच्या पवित्र सान्निध्यात संपन्न होणार असून, या आनंदवार्तेने सर्व श्रद्धाळू भक्तांच्या अंत:करणात अगणित हर्ष आणि आध्यात्मिक ऊर्जा संचारली आहे.

या वर्षीचा वार्षिक समागम "आत्ममंथन" या विषयावर आधारित आहे. हा समागम म्हणजे भक्तांसाठी एक अद्वितीय अध्यात्मिक प्रवास आहे, जिथे ते ब्रह्मज्ञानाच्या आत्मिक प्रकाशात सेवा, नामस्मरण आणि सत्संगाच्या माध्यमातून आनंद व प्रेमाभक्तीचा अनुभव घेतील.

या दिव्य उत्सवाची तयारी अत्यंत श्रद्धा, निष्ठा आणि निस्वार्थ भावनेने केली जात आहे. श्रद्धाळू भक्तगण वयस्कर असो वा युवा, पुरुष असो किंवा स्त्रिया सर्वजण मनोभावे सेवेत मग्न आहेत. समागमस्थळी पहाटेच्या पहिल्या किरणापासून ते सायंकाळच्या संध्या प्रकाशापर्यंत प्रत्येक ठिकाणी भक्तिभावाने समर्पित सेवेचे अलौकिक दृश्य दिसून येत आहे. इथे कोणी माती उचलत आहे, कोणी निवासी तंबू बांधत आहे, कोणी स्वच्छता करत आहे तर कोणी पाणीपुरवठा व भोजन व्यवस्थेची सेवा पाहतो आहे. मुंबई व महाराष्ट्रातून हजारो स्वयंसेवक समागमाच्या पूर्वतयारीसाठी आपल्या निष्काम सेवा समर्पित करत आहेत.

78 व्या वार्षिक संत समागमाची भव्यता दर्शवणारे मुख्य प्रवेशद्वारही आता आकार घेऊ लागले आहे, जे प्रेम, समरसता आणि आत्मिक एकत्वाच्या यात्रेचे प्रतीक ठरणार आहे. हे सर्व त्या समर्पण भावनेचे प्रमाण आहे, जी सतगुरुंच्या ज्ञानातून उत्पन्न होते. जसे म्हटले गेले आहे, की "जिथे सेवेत समर्पण असते, तिथे प्रत्येक क्षण उत्सव बनतो."

# मुरबाड पंचायत समिती - जिल्हा परिषद सदस्यांचे आरक्षण जाहीर!

## इच्छुक उमेदवारांची मात्र पंचायत




**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुरबाड -प्रतिनिधी**

अखेर ठाणे जिल्हा व पंचायत समित्यांचे आरक्षण आज जाहीर झाले असून अनेक दिवस गुडघ्याला बाशिंग बांधून राहिलेल्या इच्छुक उमेदवारांची गोची झाली असल्याचे पाहायला मिळत आहे.

महाराष्ट्र निवडणूक आयोग यांच्या मार्गदर्शक सुचना नुसार आज आरक्षण सोडत काढण्यात आली असून मुरबाड तालुक्यात आठ जिल्हा परिषद गट व सोळा पंचायत समिती गणाचे आरक्षणाची सोडत काढण्यात आली. मुरबाड पंचायत समिती सदस्यांची सोडत एम. आय. डी. सी. सभागृहात प्रांत अधिकारी विश्वास गुजर आणी तहसीलदार अभिजित देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत काढण्यात आली. यावेळी राजकीय पक्षांचे प्रतिनिधी, समाजिक कार्यकर्ते व पत्रकार उपस्थित होते.

मुरबाड पंचायत समितीच्या सोळा सदस्यांचे आरक्षण पुढील प्रमाणे असणार आहे. डोंगरन्हावे अनुसुचित जाती प्रवर्ग, माळ अनुसुचित जमाती महिला, तळेगाव अनुसुचित जमाती, फांगुळगव्हाण अनुसुचित जमाती, वैशाखरे नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला, धसई नागरिकांचा मागास प्रवर्ग, खोपिवली सर्वसाधारण महिला, किसळ नागरिकांचा मागास प्रवर्ग, सरळगाव सर्वसाधारण महिला, शिवळे सर्वसाधारण, कुडवली नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला, असोळे सर्वसाधारण, देवगाव सर्वसाधारण महिला, शिरवली सर्वसाधारण महिला, म्हसा अनुसुचित जमाती महिला, नारिवली सर्वसाधारण अशा प्रकारे सोळा गणांचे आरक्षण लोकसंख्येच्या नोंदणी नुसार व न्यायालय व निवडणूक आयोग यांच्या मार्गदर्शक सुचना नुसार करण्यात आल्याचे तहसीलदार अभिजित देशमुख यांनी यावेळी स्पष्ट केले. लवकरच जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकांचे बिगुल वाजणार असून राजकीय पुढार्‍यांच्यात कभी खुषी कभी गम दिसून येत आहे.

# भविष्यवेध



**मंगळवार**

**१४ ऑक्टोबर २०२५**

**मेष**

गंभीर आणि योजनाबद्ध प्रयत्नांनी आपणास यश आणि आनंद मिळेल. शांत राहाण्याचा प्रयत्न करा. पोरकटपणा करणे टाळा. इतरांवर चुकीचा प्रभाव पडू शकतो. मतभेद दूर होतील.

**वृषभ**

धार्मिक आयोजनात सहभागी व्हाल. भौतिक सुख प्राप्त होईल. विद्यार्थींच मन अभ्यासात रमेल. कौटुंबिक मतभेद दूर होतील.आपण जे करण्याची इच्छा ठेवता ते सुरुवातीपासून ठरवून घ्या.

**मिथुन**

योजनांमध्ये केलेला बदल इतर कामे करण्यासाठी प्रवृत्त करेल. काम व इच्छित योजनेला अमलात आणण्याचे प्रयत्न करा. घरातील वातावरण आनंददायी राहील. सामाजिक कामात सहयोग मिळेल.

**कर्क**

सामाजिक क्षेत्रात लाभ प्राप्तिचा योग. गूढ कार्यात यश प्राप्ति .सामाजिक क्षेत्रात धार्मिक अनुसंधानाचा योग. व्यापार क्षेत्रातील चांगली बातमी आणणारा आहे. प्रेमीजनांसाठी दिवस आनंदाने परिपूर्ण.

**सिंह**

धर्मात आस्था वाढेल. मार्ग प्रशस्त होईल. हुशारीने गुंतवलेले धन आपणास ध्येयाजवळ घेऊन जाईल. जोखिम असलेले कार्ये टाळा. जोखिम असलेल्या कार्यांमध्ये गुंतवणूक करू नये.

**कन्या**

सामाजिक क्षेत्रात, ज्ञानवर्धक कामांमध्ये हजेरी द्यावी लागेल. नाते वाईकांशी भेट होईल. आपला दृढनिश्चय आणि आत्मविश्वास अधिक चांगल्या रीतीने कार्य करण्यास आपली मदत करेल.

**तुळ**

आरोग्य मध्यम राहील. राजकीय विषयांमध्ये स्थिती सुखद राहील. अधिकार क्षेत्रात वाढ होईल. प्रयत्नांचा अल्प लाभ मिळेल. तणाव अडचणी राहतील. नाराजी दूर होईल.

**वृश्चिक**

नवे काम, विचार, योजना लांबणीवर ठेवा. आर्थिक विवादातून नुकसान संभव. आपल्या संपर्कात येणाऱ्या लोकांच्या वर्तनामुळे आपणास संताप येण्याची शक्यता आहे.

**धनु**

व्यापार उत्तम चालेल. सामाजिक कामात सक्रिय सहयोग मिळेल. मुलांच्या तब्बेतीची काळजी दूर होईल. दिवस नवी सुरुवात करण्यास किंवा व्यक्तीमत्वाचे ध्येय ठरावण्यास साहाय्यक असू शकतो.

**मकर**

विशेष महत्वाच्या आर्थिक कामात भाग्यवर्धक यश. वित्तीय कामांसाठी विशेष यात्रा. गूढ अनुसंधान संबंधी कार्ये होतील. आवडीच्या नातलगांना भेटा व स्वतःबद्दल त्यांची प्रतिक्रिया मिळवा.

**कुंभ**

आपण आपल्या घराच्या वाढीबाबत काही योजना बनवू शकता. ज्या व्यक्तीकडे फुकट घालवण्यासाठी वेळ आहे त्याचे ऐकण्याचा प्रयत्न करा आणि त्याला सल्ला द्या. यश प्राप्ति होईल.

**मिन**

योग्य उद्योगात गुंतवणूक केल्यास शेवटी आर्थिक नफा मिळेल. काही नवीन संधी मिळतील. आपण आपल्या महत्वाकांक्षा पूर्ण करू शकाल. आध्यात्मात मन रमेल. उत्पन्न वाढीबाबत योजना बनवू शकता.



### सौ. मिनाताई ठाकरे परिचर्या शिक्षण संस्थेची विद्यार्थिनी

# वैभवी फर्डे ठरली राज्यस्तरीय सर्वोत्कृष्ट विद्यार्थिनी




**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे (१३) :** ठाणे महानगरपालिकेच्या सौ. मिनाताई ठाकरे परिचर्या शिक्षण संस्थेची विद्यार्थिनी वैभवी फर्डे हिला सर्वोत्कृष्ट विद्यार्थिनी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. लातूर येथे झालेल्या स्टुडंट नर्सेस असोसिएशन ऑफ इंडियाच्या (एसएनएआय) ३१व्या द्वैवार्षिक राज्य परिषदेत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.

लातुर येथे नुकत्याच (शुक्रवार, १० ऑक्टोबर) झालेल्या द्वैवार्षिक परिषदेत ट्रेंड नर्सेस असोसिएशन ऑफ इंडिया (TNAI) या संस्थेच्या महाराष्ट्र राज्य शाखेतर्फे हा पुरस्कार देण्यात आला. महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलच्या सचिव रत्ना देवरे यांच्या हस्ते या पुरस्काराचे वितरण करण्यात आले. त्याप्रसंगी, महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलचे उपाध्यक्ष अरुण कदम, टीएनआयएचे उपाध्यक्ष दीपकमल, महाराष्ट्र राज्य शाखेचे राजाभाऊ राठोड, एसएनएआयच्या सल्लागार शिल्पा शेट्टीगार आदी उपस्थित होते.

सौ. मिनाताई ठाकरे परिचर्या शिक्षण संस्थेत जीएनएमचे शिक्षण घेत असलेली वैभवी फर्डे हिला उत्कृष्ट शैक्षणिक प्रगती, क्लिनिकल कौशल्य, नेतृत्वगुण तसेच, नर्सिंग व्यवसायातील निष्ठा आणि समर्पण यांचा गौरव म्हणून हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. शिक्षण काळात तिने सातत्याने करुणा, प्रामाणिकपणा आणि रुग्णसेवा व सुरक्षेप्रती असलेली सखोल बांधिलकी कर्तव्यातून दाखवली.

या पुरस्कारात माझी संस्था, सर्व शिक्षक, प्राचार्य, पालक यांचा मोलाचा वाटा आहे. मी केलेल्या मेहनतीचे हे फळ आहे. त्याबद्दल मनापासून आनंद झाल्याची प्रतिक्रिया वैभवी फर्डे हिने व्यक्त केली. तर, संस्था परिवाराकडून वैभवी फर्डे हिचे या यशाबद्दल हार्दिक अभिनंदन. तिचे हे यश सौ. मिनाताई ठाकरे परिचर्या शिक्षण संस्थेने दिलेल्या उत्कृष्ट शिक्षण आणि प्रशिक्षणाचे प्रतीक आहे. तिच्यासारखी विद्यार्थिनी आमच्या संस्थेची प्रतिनिधी असल्याचा आम्हाला अभिमान असल्याची प्रतिक्रिया संस्थेच्या प्राचार्या प्राची धारप यांनी व्यक्त केली आहे.

एस.एन.ए.आय.च्या ३१व्या द्वैवार्षिक राज्य परिषदेत संस्थेतर्फे नर्सिंग ट्यूटर चित्रा पोळेकर, रेखा कुंभार आणि संस्थेतील २१ विद्यार्थिनी सहभागी झाल्या होत्या. या परिषदेच्या निमित्ताने विविध स्पर्धा घेण्यात आल्या. त्यात, पल्लवी पवार हिला पेन्सिल स्केचिंगमध्ये दुसरे, तर, प्रणाली पाटील आणि गौरी जाधव यांना पोस्टर पेण्टींगमध्ये तिसरे बक्षीस मिळाले. त्याचबरोबर, संस्थेला महाराष्ट्रातून उत्कृष्ट एसएसएआय युनिटचे दुसरे पारितोषिक मिळाले.

# भिवंडी महापालिकेत अटीशर्थींनुसार सानुग्रह अनुदान

## कर्मचारी - कामगार संघटनांमध्ये तीव्र नाराजी

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**भिवंडी (शरद भसाळे) :** भिवंडी शहर महानगर पालिकेच्या आस्थापनेवरील अधिकारी व कर्मचा-यांना तसेच प्राथमिक शिक्षण विभागात व माध्यमिक शिक्षण विभागात कार्यरत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांना दिवाळी सणापुर्वी रुपये १४ हजार २०० रूपये सानुग्रह अनुदान देण्याचे आदेश महापालिकेचे प्रशासक तथा आयुक्त अनमोल सागर यांनी असून त्यासाठी त्यांनी घातलेल्या अटीशर्थीमुळे काही कर्मचाऱ्यांची दिवाळी अंधारात जाणार आहे.

**“ महानगर पालिका अधिकारी व कर्मचारी यांना सालाबाद प्रमाणे सन 2025 या सालाकरीता प्रत्येक कर्मचाऱ्यांला 16 हजार 200 रुपये दिवाळी सानुग्रह अनुदान देण्यात यावे, अशी मागणी भारतीय कामगार कर्मचारी महासंघाच्या पदाधिकाऱ्यांनी आयुक्त तथा प्रशासक अनमोल सागर यांच्याकडे 15 दिवसापूर्वी लेखी निवेदनपत्राद्वारे केली आहे. मागील वर्षामध्ये म्हणजे सन 2024 या साला करीता पालिका आयुक्त प्रशासनाने दिवाळी सानुग्रह अनुदान 14 हजार 200 रुपये मात्र प्रत्येक कर्मचाऱ्याला दिले होते.तसेच प्रत्येक वर्षामध्ये देण्यांत आलेल्या दिवाळी सानुग्रह अनुदानाच्या रक्कमे मध्ये 2 हजार रुपये वाढ करण्याची मागणी आहे. त्यानुसार या वर्षी सुध्दा म्हणजे सन 2025 या वर्षाच्या सानुग्रहाच्या रक्कमे मध्ये 2 हजार रुपयाची वाढ करुन पालिका अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रत्येकी 16 हजार 200 रूपये दिवाळी सानुग्रह अनुदान देण्यांत यावे, अशी मागणी भारतीय कामगार कर्मचारी महासंघाच्या भिवंडी युनिट सचिव श्रीपत तांबे व अध्यक्ष भानुदास भसाळे यांनी केली होती असे असताना अचानकपणे आयुक्तांनी सानुग्रह अनुदान संदर्भात वेगळी भूमिका घेतल्याने पालिकेतील विविध युनियन कर्मचारी कामगार व पदाधिकारी तीव्र नाराजी व्यक्त करीत असुन आता कृती समितीच्या वतीने सानुग्रह अनुदानाबाबत भूमिका ठरवली जाईल अशी माहिती युनियनच्या काही पदाधिकाऱ्यांनी दिली.**

महापालिका आयुक्तांनी अचानक घेतलेल्या या निर्णयामुळे

पालिकेचे कामगार कर्मचारी व विविध युनियनचे पदाधिकाऱ्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली असुन कृती समितीच्यावतीने युनियन काय निर्णय घेतात याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

भिवंडी महानगर पालिकेच्या सन-२०२५-२६ या वित्तीय वर्षातील अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकानुसार सन २०२४-२५ या वित्तीय वर्षासाठी रुपये १४ हजार ,२०० दोनशे रुपये मात्र अटी व शर्तीनुसार सानुग्रह अनुदान अदा करणेबाबत प्रशासकीय ठराव क्र. २४३ दि.१०/१०/२०२५. प्रमाणे ठराव घेऊन संबधीतांनी आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करावी असा आदेश आयुक्त अनमोल सागर यांनी प्रशासकीय अधिकाऱ्यांना दिला आहे.या ठरावानुसार महानगर पालिकेच्या आस्थापनेवरील अधिकारी व कर्मचा-यांना तसेच प्राथमिक शिक्षण विभागात व माध्यमिक शिक्षण विभागात कार्यरत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांची सेवा सन-२०२४/२५ मध्ये एक वर्षपेक्षा कमी मात्र ६ महिन्यापेक्षा जास्त असल्यास सदर कर्मचा-यांना सानुग्रह अनुदानाची रक्कम देय राहील.मात्र सदर वित्तीय वर्षात ६ महिन्यापेक्षा कमी सेवा असलेल्या कर्मचा-यांना सानुग्रह अनुदानाची रक्कम देय असणार नाही. सन-२०२४-२५ या वित्तीय वर्षात संपूर्ण वर्ष निलंबीत असलेला कर्मचारी हा सानुग्रह अनुदान मिळण्यास पात्र असणार नाही.तसेच निलंबीत कर्मचारी यांचा निलंबन कालावधी हा एक वर्षपेक्षा कमी असल्यास अथवा ज्या निलंबित कर्मचा-यांना महानगरपालिकेने हजर करून घेतलेले आहे.अशा कर्मचा-यांना हजर दिनांकापासून कर्तव्य सेवा कालावधी १८० दिवस वा जास्त असल्यास त्यांना सदर रक्कम देय राहील. सन-२०२४-२०२५ या वित्तीय वर्षात शिस्तभंग विषयक कारवाईत दंड लावण्यात आलेल्या व वेतनवाढ रोखलेल्या किंवा गंभीर शिक्षा झालेल्या कर्मचाऱ्यांना सदर सानुग्रह अनुदान रक्कम देय असणार नाही. महागरपालिकेमध्ये कार्यरत असलेले प्रतिनियुक्तीवरील अधिकारी/कर्मचारी तसेच महानगरपालिकेच्या आस्थापनेवर, प्राथमिक शिक्षण विभागामध्ये व माध्यमिक शिक्षण विभागामध्ये कार्यरत असलेले रुपये ४,८०० (९-१७) व त्यापेक्षा जास्त ग्रेड वेतन असणाऱ्या कर्मचा-यांना सदर सानुग्रह अनुदान रक्कम देय असणार नाही, असे आदेश प्रशासक तथा आयुक्त अनमोल सागर यांनी संबंधितांना दिले आहेत.त्यामुळे महापालिकेतील काही अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची दिवाळी अंधारात जाण्याची शक्यता असल्याचे महापालिका वर्तुळात बोलले जात आहे मात्र सानुग्रह अनुदानापासून वंचित राहणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची संख्या अद्याप जाहीर झाली नाही.

# महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटनेची टीईटी बाबत पुनर्विचार याचिका दाखल!

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**वासिंद (प्रतिनिधी)-** महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटनेची टीईटी बाबत पुनर्विचार याचिका (रिव्ह्यू पिटीशन) दाखल करण्यात आली आहे.

गेल्या अनेक दिवसांपासून शिक्षकांना परत एकदा टीईटी द्यावी लागणार अशा बातम्या समाज माध्यमातून फिरताना दिसत असल्याने टीईटीच्या या बातम्या मुळे अनेक शिक्षक वर्ग मानसिक तणावामध्ये आहेत.

यातच सिंधुदुर्ग मधील एका शिक्षक बांधवांनी स्वतःचे जीवन देखील संपवले यावर तातडीची पावले उचलत महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटना पुढे सरसावली असून यामुळे पुनर्विचार याचिका (रिव्ह्यू पिटीशन) दाखल करण्यात आली आहे.

यासाठी महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटनेचे राज्याध्यक्ष वितेश खांडेकर, राज्य सरचिटणीस गोविंद उगले, राज्यकार्याध्यक्ष आशुतोष चौधरी, प्राजक्त झावरे, राज्य सल्लागार सुनील दुधे, मीडिया प्रमुख विनायक चौथे, यांच्यासह सर्वच प्रमुख पदाधिकाऱ्यांनी टीईटी संदर्भात न्यायालयीन प्रक्रिया प्रक्रियेची तात्काळ कारवाई करण्यासाठी प्रयत्न सुरू केले. यामध्ये पदवीधर आमदार ॲड.अभिजीत दादा वंजारी यांनी देखील महत्त्वाची भूमिका बजावली व याचाच परिणाम म्हणून महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटनेतर्फे रिव्ह्यू पिटिशन म्हणजेच पुनर्विचार याचिका दाखल करण्यात संघटनेला यश मिळाले आहे.

सदर पिटीशनचा केस डायरी नंबर 59344/2025 असा आहे असे संघटना राज्य प्रसिद्धी प्रमुख संतोष देशपांडे यांनी प्रसिद्धी माध्यमाद्वारे म्हटले आहे अशी माहिती संघटनेचे ठाणे जिल्हाध्यक्ष अरुण कराळे यांनी दिली आहे.

दरम्यान, कोणीही टीईटी संदर्भात कोणत्याही प्रकारचे मानसिक दडपण घेऊ नये मग कोणतीही टोकाचे पाऊल उचलू नये. महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटना खंबीरपणे आपल्या सर्वांसोबत आहे असे आवाहन संघटना राजाध्यक्ष वितेश खांडेकर यांनी केले आहे तर ज्यावेळी आम्ही नोकरीस लागलो त्या-त्यावेळी असणारे सर्व निकष पूर्ण करूनच आमची निवड झाली होती. त्यामुळे अनेक वर्षानंतर अशाप्रकारची परीक्षा घेणे हे संयुक्तिक ठरणार नाही यावर गांभीर्याने विचार व्हावा असे संघटना ठाणे जिल्हाध्यक्ष अरुण कराळे यांनी म्हटले आहे.




# आपण प्रत्येक भाषेचा आदर केला पाहिजे - स्नेहा मोहिते

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे : प्रतिनिधी**

हिंदी ही आपली अधिकृत भाषा आहे, राष्ट्रभाषा नाही. १४ सप्टेंबर १९४९ रोजी संविधान सभेने हिंदीला अधिकृत भाषा करण्याचा निर्णय घेतला. १४ सप्टेंबर १९५३ पासून हिंदी दिन साजरा केला जातो. काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत, संसदेपासून वर्तमानपत्रांपर्यंत आणि साहित्यापासून हिंदी चित्रपटांपर्यंत हिंदीचा वापर केला जातो. भारतात १२१ हून अधिक भाषा बोलल्या जातात. २०११ च्या जनगणनेनुसार, ४४% लोकसंख्येचे, म्हणजेच ५३ कोटींहून अधिक लोक हिंदी बोलतात. आपण प्रत्येक भाषेचा आदर केला असे प्रतिपादन हिंदी भाषा दिना निमित्त आयोजित कार्यक्रम प्रसंगी स्नेहा मोहिते यांनी केले.

रयत कल्याण सामाजिक संस्था संचलित सावित्रीबाई फुले बालवाडी, रामभाऊ भिसे बाल विकास मंदिर (प्राथमिक ) व रतन बुवा पाटील माध्यमिक विद्यामंदिर यांच्या संयुक्त निळजे, डांबिवली, ठाणे येथे हिंदी दिवस समारोह कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून श्री रंग विद्यालयाच्या वरिष्ठ शिक्षिका स्नेहा मोहिते तर अध्यक्षस्थानी संस्थेच्या अध्यक्षा सुलभा उत्तम कांबळे ह्या होत्या.

कार्यक्रमासाठी प्रकाश गवारी, संस्था समन्वयक राजेंद्र भुसारा, प्राथमिक मुख्याध्यापिका अर्चना घायवट, माध्यमिक मुख्याध्यापका प्रतीक्षा गमरे, माध्यमिक प्रमुख सोनाली यादव, खुळपे सर सह विद्यार्थी, शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांनी हिंदी कविता व हिंदी गाण्यावरती नृत्य सादर करून मान्यवरांची मने जिंकली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभार शालेय विद्यार्थ्यांनी केले.

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

| | |
|---|---|
| Facebook | https://www.facebook.com/jeevandeepnews/ |
| Instagram | https://www.instagram.com/thane_jeevandeep/ |
| X | https://x.com/Jeevandeepvarta |
| www | https://jeevandeepvarta.com/ |

# रामेश्वरी पाटील यांना “राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार”!

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**शहापूर ग्रामीण**
**नरेंद्र पाटील**

रविवार, १२ ऑक्टोबर २०२५ रोजी मुंबईतील काँग्रेस कमिटी प्रदेश कार्यालय, दादर येथे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस शिक्षक सेलतर्फे आयोजित राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार सन्मान सोहळा मोठ्या थाटात संपन्न झाला. यावर्षीचा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार रामेश्वरी विलास पाटील (ग.वि.स. मंडळ आमची शाळा, टिळक नगर, चेंबूर, मुंबई) देण्यात आला असून, त्यांच्या कार्याचा गौरव करत शैक्षणिक क्षेत्रात नव्या प्रेरणेचा संदेश देण्यात आला आहे.

या सत्कार सोहळयास हर्षवर्धनजी सपकाळ (प्रदेशाध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस समिती) प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. तर विजयजी बडेडीयार (महाविद्यालयीन शिक्षण प्रकल्पप्रमुख), संतोषजी पाटील (राष्ट्रीय शिक्षक



परिषद कार्याध्यक्ष), आयोजन समिती व समन्वय समितीचे अध्यक्ष सचिन दुगाड (पुणे), समन्वयक प्रा. यशराज पारखी (पुणे), जिल्हा संपर्क प्रमुख प्रा. डॉ. नितिन देढळोळकर (अकोला) आणि सचिव संदीप शेखळेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

रामेश्वरी पाटील यांनी शिक्षण क्षेत्रात दीर्घकाळ निष्ठेने आणि प्रामाणिकपणे सेवा बजावली आहे. सुशिक्षित, संस्कारी आणि समाजाभिमुख व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांनी विद्यार्थ्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवले आहेत. त्यांच्या योगदानामुळे शिक्षणक्षेत्रात आदर्श निर्माण झाला असून. समाजजीवनातही प्रेरणादायी उदाहरण घडले आहे. त्यांना मिळालेल्या या पुरस्काराद्वारे ज्ञानदानाचा उत्सव समजणाऱ्या शिक्षक सेवेला सलाम दिलेला आहे.

यावेळी प्रमुख अतिथी हर्षवर्धनजी सपकाळ म्हणाले की, रामेश्वरी पाटील यांना मिळालेला पुरक्कार हा केवळ पुरस्कारच नसून तो महाराष्ट्रातील शिक्षकांच्या समर्पणभावनेचं प्रतीक आहे. “ज्ञानदान हेच सर्वश्रेष्ठ दान” या विचाराला मूर्त रूप देणाऱ्या शिक्षकांचा हा सन्मान संपूर्ण शिक्षक समाजासाठी प्रेरणादायी ठरेल.” सदर पुरस्कार मिळाल्याबाबत रामेश्वरी पाटील यांचे सर्वत्र मनःपूर्वक अभिनंदन करण्यात येत आहे.

# राज्य एड्स नियंत्रण कर्मचाऱ्यांच्या सेवा समायोजनाबाबत शासन सकारात्मक

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुंबई, दि. १३ :** राज्य एड्स नियंत्रण संस्थेअंतर्गत कंत्राटी पद्धतीने कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या सेवांचे समायोजन करण्याबाबत सकारात्मक विचार केला जाईल, असे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी सांगितले. निर्मल भवन येथे राज्य एड्स नियंत्रण कर्मचारी सेवा समायोजन कृती समितीच्या प्रतिनिधींशी झालेल्या बैठकीत त्या बोलत होत्या. बैठकीस एड्स नियंत्रण संस्थेचे वरिष्ठ अधिकारी तसेच कृती समितीचे पदाधिकारी उपस्थित होते. राज्यभर एड्स नियंत्रण कार्यक्रमांतर्गत १,६०० कर्मचारी कंत्राटी तत्वावर कार्यरत आहेत. यातील बहुतांश कर्मचारी २५ ते ४० वयोगटातील असून त्यांना या क्षेत्रातील अनुभव आहे. भविष्यात एड्स नियंत्रण कार्यक्रम अधिक प्रभावीपणे राबवण्यासाठी अनुभवी मनुष्यबळाची आवश्यकता लक्षात घेता, या कर्मचाऱ्यांच्या सेवांचे समायोजन करण्यासाठी वरिष्ठ स्तरावर सकारात्मक प्रयत्न करण्यात येतील, असेही आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी यावेळी सांगितले.

### कास्ट्राईब कर्मचारी महासंघ व शिक्षक संघटनेच्या वतीने

# सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावर झालेल्या भ्याड हल्ल्याचा निषेध




**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**वासिंद (प्रतिनिधी) -** कास्ट्राईब कर्मचारी महासंघ व शिक्षक संघटनेच्या वतीने सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावर झालेल्या भ्याड हल्ल्याचा निषेध करून दोषीवर कठोर कारवाई करण्याबाबत जिल्हाधिकारी ठाणे यांच्या मार्फत शासनास निवेदन देण्यात आले.

भारतीय लोकशाही व्यवस्थेचा महत्वाचा स्तंभ, भारतीय संविधानाचे रक्षण करणारे न्यायपीठ व त्या न्यायपिठावरून आदर्श न्यायदान करणारे, संविधान रक्षक सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावर जातीयवादी मानसिकतेतून न्यायालयाचे कामकाज सुरु असतानाच राकेश तिवारी या वकिलाने भ्याड हल्ला करून सर्वोच्च न्यायालय, भारतीय संविधान व भारतीय लोकशाही यांचा या कृत्याने अवमान केला आहे.

या भ्याड हल्ल्याचीं उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी तसेच भविष्यात अशा देश विघातक घटना घडू नयेत याकरिता प्रतिबंधात्मक उपाययोजना व्हाव्यात या मागणीसाठी कास्ट्राईब कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष कृष्णा इंगळे यांच्या आदेशानुसार तर शिक्षक संघटनेचे उपाध्यक्ष विजयकुमार जाधव यांच्या नेतृत्वाखाली शुक्रवार दि. 10 ऑक्टोंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे येथे निवासी उपजिल्हा अधिकारी डॉ. संदीप माने यांच्यामार्फत भारताचे राष्ट्रपती, महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल व मुख्यमंत्री महोदय यांना निवेदन सादर करण्यात आले.

यावेळी महासंघ कोकण अध्यक्ष संतोष गाढे, केंद्रप्रमुख अध्यक्ष विनायक भालेराव, राज्य कार्यकारणी सदस्य अशोक गायकवाड, सेवानिवृत्त युनिट अध्यक्ष किशोर भोईर, भिवंडी उपाध्यक्ष श्यामकांत नवाळे, भिवंडी संघटक नरेश वाळंज, नवी मुंबई अध्यक्ष व्यंकटेश कांबळे, पूर्णकला नवाळे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# पीएम श्री जिल्हा परिषद डोहोळेपाडा शाळा उत्कृष्ट शैक्षणिक कार्य पुरस्काराने सन्मानित !

**शहापूर ग्रामीण ( नरेंद्र पाटील)**


वासिंद जवळील पीएम श्री जिल्हा परिषद डोहोळेपाडा शाळेतील उत्कृष्ट शैक्षणिक कार्याबद्दल या शाळेला पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. भिवंडी पंचायत समिती शिक्षण विभागाच्या वतीने आयोजित व ओसवाल विद्यालय भिवंडी येथे पार पडलेल्या आदर्श शिक्षक व आदर्श शाळा गुणगौरव समारंभात भिवंडी लोकसभा खासदार सुरेश म्हात्रे (बाळ्या मामा) यांच्या हस्ते व उपस्थितीत हा सन्मान करण्यात आला. सदर शाळेत



सुंदर परसबाग व किचन बगीचा, सुसज्ज सुंदर ईमारत, गांडूळखत, स्वच्छता पखवाडा ,एक पेड माँ के नाम, स्वच्छ सुंदर शाळा, निपूण महाराष्ट्र, दिशा प्रोजेक्ट, ईको कल्ब, शंभर पटनोंदणी व उपस्थिती, गुणवत्तापूर्ण शिक्षण, उपक्रम. महापुरुषांच्या जयंत्या, पुण्यतिथ्या साजरे करणे, सहशालेय विविध उपक्रम असे अनेक उपक्रम राबविण्यात येत आहेत.

या उपक्रम व शैक्षणिक कार्याची दखल घेऊन शाळेतील तत्कालीन मुख्याध्यापक अशोक गायकवाड व सहशिक्षिका दिलशाद शेख यांना शाल, सन्मानपत्र, पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी खासदार सुरेशजी म्हात्रे यांच्यासह भिवंडी पं.स. गटविकास अधिकारी गोविंद खामकर, गटशिक्षण अधिकारी संजय असवले, योजना प्रमुख तथा शिक्षण विस्तार अधिकारी वैशाली डोंगरे, कास्ट्राईब शिक्षक संघटना वरिष्ठ उपाध्यक्ष विजय कुमार जाधव, कोकण अध्यक्ष संतोष गाढे आदि विविध संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.





ठाणे ■ मंगळवार
14 ऑक्टोबर 2025

दैनिक ठाणे
जीवनदीप वार्ता

पान ४


# दिवाळीसाठी बाजारपेठा सजल्या - खरेदीसाठी तोबा गर्दी

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**वाशी, ता. १३** नवी मुंबईतील बाजारपेठा आता दिवाळीच्या उत्साहाने उजळल्या आहेत. बाजारात निरनिराळ्या रंगाच्या पणत्या, रांगोळी, आकाश कंदील, फटाके, सुंगधी उटणे, लाइटिंग माळा आणि फराळाचे पदार्थ सजले आहेत. नागरिकांनी दिवाळीच्या खरेदीस सुरुवात केली असून, बाजारपेठेत गर्दी वाढू लागली आहे. पारंपरिक मातीच्या पणत्या तसेच चिनी मातीच्या डिझाइनिंग पणत्या मोठ्या प्रमाणात बाजारात दाखल झाल्या आहेत. पारंपरिक मातीच्या पणत्यांची किमत २५ ते ३० रुपये डझन, तर चिनी मातीच्या पणत्यांची ४० ते ६० रुपये डझन आहे. याशिवाय डेकोरेटिव्ह पणत्यादेखील उपलब्ध आहेत, ज्या २० रुपये दोन या दरात विकल्या जात आहेत. नागरिकांचा कल पारंपरिक आणि आकर्षक डिझाइनिंग पणत्यांकडे अधिक आहे. दिवाळीच्या शुभस्मरणासाठी रांगोळीचे विशेष महत्त्व असते. अनेक गृहिणींना वेळेअभावी पारंपरिक रांगोळी काढता येत नाही, त्यामुळे रेडीमेड रांगोळी बाजारात दाखल झाली आहे. रंगीबेरंगी खड्यांचा व मण्यांचा वापर करून तयार केलेल्या रांगोळ्या अल्पावधीत लोकप्रिय ठरल्या आहेत. बाजारात विविध डिझाइनच्या गोलाकार जाळ्या विक्रीसाठी ठेवण्यात आल्या आहेत, ज्यामध्ये मोर, पावले, देवी-देवता, फळे, वेली इत्यादी डिझाइन उपलब्ध आहेत. आकर्षक आकाश पारंपरिक आकाश कंदिलासोबत चायना मेड आकाश कंदीलदेखील बाजारात दाखल झाले आहेत, मात्र देशी बनावटीच्या कंदिलांकडे ग्राहकांचा कल आहे. प्लॅस्टिकचे कंदील ५० रुपयांपासून, तर चायना कंदील १५० रुपयांपासून उपलब्ध आहेत. तसेच फिरकी, चांदणी, झालर या प्रकारच्या कंदिलांचीही बाजारात मोठी गर्दी आहे.

## केडीएमसी क्षेत्रात नियतकालिक मूल्यांकन चाचणी परीक्षा संपन्न




**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** कल्याण डोंबिवली महानगरपालिका शिक्षण विभागाच्या अंतर्गत येणाऱ्या सर्व महानगरपालिका शाळा व खाजगी अनुदानित शाळांमध्ये इयत्ता 2 री ते 8 वी च्या वर्गातील विद्यार्थ्यांसाठी PAT -2 तथा संकलित 1 परीक्षेतील मातृभाषा (प्रथम भाषा) व गणित विषयाची परीक्षा अनुक्रमे शुक्रवार व शनिवारी घेण्यात आली.

या परीक्षेसाठी कल्याण डोंबिवली महानगरपालिका शिक्षण विभागाने योग्य नियोजन करून प्रश्नपत्रिकांचे वाटप संबंधित शाळांना केले. यामध्ये प्रामुख्याने भाषा, गणित व इंग्रजी या विषयांच्या प्रश्नपत्रिकांचा अंतर्भाव होता. या परीक्षेदरम्यान प्रशासन अधिकारी, शिक्षणाधिकारी यांच्यासह सर्व पर्यवेक्षकीय यंत्रणेच्या शाळा भेटींचे नियोजन करण्यात आले होते.

शिक्षण विभागाचे उपायुक्त संजय जाधव, प्रशासन अधिकारी भारत बोरनारे व शिक्षणाधिकारी विजय सरकटे यांनी कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील 59 मनपा शाळा व 219 खाजगी अनुदानित शाळांमध्ये परीक्षेचे उत्तम नियोजन करण्याबाबत वेळोवेळी मार्गदर्शन केले. PAT-2 चाचणी योग्य नियोजनात वेळापत्रकानुसार भाषा विषयाची परीक्षा शुक्रवारी व गणिताची परीक्षा शनिवारी संपन्न झाली.

## ठाणकर पाडा शिवसेना शाखेच्या वतीने घरेलू कामगार महिलांचा सन्मान




**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** शिवसेना ठाणकर पाडा विभागीय शाखेतर्फे माजी नगरसेवक, उपशहर प्रमुख मोहन उगले यांच्याकडून घरेलू कामगार महिलांना दिवाळीनिमित्त फराळ, साडी वाटप करून सन्मान करण्यात आला. प्रभागातील सोसायट्यांना ओला व सुका कचरा वर्गीकरणासाठी दोन दोन कचऱ्याचे डस्टबिन देण्यात आले. शिवसेना जिल्हा प्रमुख अरविंद मोरे, महिला कल्याण शहर संघटक नेत्रा उगले, युवासेना जिल्हा चिटणीस वैभव भोईर यांच्या उपस्थिती परिसरातील घरेलू कामगार महिलांना दिवाळीनिमित्त फराळ आणि साडी तसेच प्रभागातील सोसायटीना डस्टबिन वाटप करण्यात आले.

याप्रसंगी विभाग प्रमुख अनंता पगार, महिला उपशहर संघटक कल्पना जमदाडे, युवासेना उपशहर प्रमुख मेघन सेल्फी, उपविभाग प्रमुख दिगंबर ठाणगे, महिला विभाग संघटक सुनिता मोरे, सुरेखा दिघे, शाखाप्रमुख नितीन कदम, महिला शाखा संघटक ज्योती पाटील, उपशाखा प्रमुख गणेश कुंभारकर, उमेश भुजबळ, विजय सिंह, संदीप पगारे, आशिष झाडे यांच्यासह शिवसेना पदाधिकारी, शिवसैनिक, युवासैनिक, महिला आघाडी तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी जिल्हाप्रमुख अरविंद मोरे यांनी सांगितले की, पावसाळा आली कि नवनवीन छत्री दिसतात त्या प्रमाणे आता प्रभागात फेऱ्या मारणारे दिसतील, त्यांच्या भुलाथापांना बळी पडू नका, विकास कामे करणारा एकमेव नगरसेवक मोहन उगले आहे. येणाऱ्या महापालिकेच्या निवडणुकीत आमची युती झाली तर ठिक नाहीतर आम्ही एकटे लढू असे सांगितले.

## मुरबाड तालुका कुणबी समाजोन्नती मंडळाची सहविचार सभा संपन्न!




**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुरबाड : दिलीप पवार**

कुणबी समाजात अनेक वर्षा पासून जुन्या अनिष्ट रूढी,प्रथा चालीरीती, परंपरा आहेत आणी त्यामध्येच समाज गुरफटून गेला आहे.त्यासाठी समाजाने आधुनिक विचाराची कास धरली पाहीजे, नविन विचार प्रणाली आत्मसात केली पाहिजे. बदलत्या युगात समाजाने कात टाकली पाहीजे यासाठी मुरबाड तालूका कुणबी समाजोन्नती मंडळाच्या वतीने तालुक्यात विभागा नुसार सहविचार सभा घेतल्या जात आहेत. यामध्ये समाज बांधवांची मते जाणून घेतली जात आहेत व त्यानंतर विशेष अधिवेशन लावून काही निर्णय पारीत केले जाणार आहे. शिवळे विभागाची सहविचार सभा शेलारी येथे माजी अध्यक्ष शांताराम बांगर यांच्या निवासस्थानी पार पडली. यावेळी समाजाचे जेष्ठ सल्लागार सुभाष घरत यांनी काळानुसार समाजाने बदलले पाहीजे व आर्थिक बचत करता आली पाहिजे असे मत व्यक्त केले तर शिवळे विद्यालयाचे प्राचार्य प्रा.मनोहर इसामे, प्रा.धनाजी दळवी, पत्रकार दिलीप पवार यांनी सामाजिक प्रबोधन पर विचार मांडले. तर या सभेचे अध्यक्ष स्थान रघुनाथ बांगर यांनी भुषविले. या सभेसाठी मंडळाचे अध्यक्ष गणपत विशे, उपाध्यक्षा ज्योतीताई गोडांबे,सचिव अरविंद विशे, सहसचिव धनाजी खापरे, जेष्ठ सल्लागार आत्माराम सासे, खजिनदार पंढरीनाथ आलम,आत्माराम रांजणे, संभाजी गोडांबे, भास्कर बांगर, भालचंद्र गोडांबे,कल्पना पवार यांच्यासह मोठ्या संख्येने समाज बांधव उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन रमेश तुंगार यांनी केले.

# शिक्षकांची दिवाळी गोड होणार

### दिवाळीपूर्वी शिक्षकांना मिळणार टप्पा वाढ अनुदानासह वेतन

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे : प्रतिनिधी**



राज्यातील शिक्षकांना टप्पावाढ अनुदानाचा आदेश व निधी मिळावा म्हणून मागील आठवड्यामध्ये कोकण विभागाचे शिक्षक आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे व माजी आमदार श्रीकांत देशपांडे यांनी मंत्रालय स्तरावर पाठपुरावा केला होता. वेळेप्रसंगी फाईल अडवणाऱ्या अधिकाऱ्यांशी भांडण करून अनुदानाची फाईल वित्त विभागाकडे पाठवली होती. परंतु अनुदानाचा आदेश निघत नसल्याचे लक्षात येताच शिक्षक आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे व माजी आमदार श्रीकांत देशपांडे यांनी प्रधान सचिव शालेय शिक्षण रंजीतसिंह देओल व कक्ष अधिकारी स्मिता देसाई यांची दि.13 आक्टोबर 2025 रोजी सकाळी भेट घेतली. आजच्या आज टप्पावाढ निधी वितरण आदेश निघालाच पाहिजे आणि BDS द्वारे शिक्षण संचालक यांना निधी वितरीत झालाच पाहिजे अशी आग्रही मागणी धरली.

समस्येचे गांभीर्य लक्षात घेऊन प्रधान सचिव यांनी शिक्षण विभागाला सूचना दिल्या की आजच आदेश पारित करा व बीडीएसद्वारे निधी संचालक कार्यालयाला वर्ग करा. आजच अनुदान निधी वितरणाचा आदेश निघेल व निधी संचालकांकडे वर्ग केला जाईल. त्यामुळे सर्व शिक्षकांना दिवाळीपूर्वी वाढीव टप्प्यासह वेतन मिळणार आहे. खऱ्या अर्थाने शिक्षकांची दिवाळी गोड होणार आहे असे आ. ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी उपस्थित शिक्षकांना आश्वासित करून सर्व शिक्षकांवांना दीपावलीच्या शुभेच्छा दिल्या.



### हॉटेल अँड रेस्टॉरंट असोसिएशनच्या अमृतमहोत्सवानिमित्त

## दोन दिवसीय रिजनल कन्व्हेंशन पर्यटन क्षेत्रातील विविध विषयांवर चर्चा

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुंबई, दि. १३ :** हॉटेल अँड रेस्टॉरंट असोसिएशन ऑफ वेस्टर्न इंडिया च्या अमृतमहोत्सवानिमित्त २०वे रिजनल कन्व्हेंशन ताज लँड्स एंड, वांद्रे येथे पार पडले. दोन दिवसीय रिजनल कन्व्हेंशन पर्यटन क्षेत्राला चालना देण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरले. दोन दिवसीय रिजनल कन्व्हेंशनमध्ये पर्यटनाच्या दृष्टीने अनेक महत्त्वाच्या विषयांवर चर्चा झाली. या कन्व्हेन्शन कार्यक्रमाला पर्यटन क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थिती दर्शवून, पर्यटनाला अधिक चालना मिळावी या दृष्टीने महत्वाचे मुद्दे मांडले. महाराष्ट्राच्या पर्यटन क्षेत्राला जागतिक ओळख मिळण्यासाठी कन्व्हेंशनमध्ये झालेला संवाद मोलाचा ठरला. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक निलेश गटणे म्हणाले, पर्यटन क्षेत्राला अधिक चालना मिळावी म्हणून महाराष्ट्र पर्यटन एका नव्या पर्वाची सुरुवात करत आहे. नुकताच युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांच्या यादीत महाराष्ट्रातील गडकिल्ल्यांचा समावेश करण्यात आला आहे. या स्थळांना पर्यटनाच्या दृष्टीने जागतिक दर्जा मिळावा, म्हणून आम्ही आदरातिथ्य क्षेत्राला आमच्याबरोबर काम करण्याचे आमंत्रण देत आहोत. महाव्यवस्थापक जयस्वाल यांनी सांगितले की, ब्ल्यू फ्लॅग समुद्रकिनाऱ्यांच्या यादीमध्ये महाराष्ट्रातील पाच समुद्र किनाऱ्यांचा, यात डहाणूमधील पारनाका, रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन व नागाव, तसेच रत्नागिरी जिल्ह्यातील गुहागर व लाडघर यांचा समावेश झाला आहे. सिंधुदुर्गमध्ये पाण्याखालील पर्यटन प्रकल्पाचेही अनावरण करण्यात आले आहे. निवृत्त युद्धनौका आयएनएस गुलदारचे पाण्याखाली संग्रहालय आणि कृत्रिम बेट तयार करण्यात येणार आहे, असेही त्यांनी सांगितले. या रिजनल कन्व्हेंशनमध्ये पर्यटन संचालनालयाच्या वतीनेसहाय्यक संचालक सुशील पवार, व विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सहभाग घेतला. एच.आर.ए.डब्ल्यू.आय अध्यक्ष जिमी शॉ यांनी सांगितले की, १९५१ मध्ये असोसिएशनची स्थापना झाली. असोसिएशनने पश्चिम भारतात आपले स्थान अधिक बळकट केले. या ७५व्या वर्धापनदिनानिमित्त महाराष्ट्र शासनाच्या सहकार्याने पर्यटन उद्योगाला अधिक चालना आणि बळकटपणा देण्यासाठी प्रयत्न करू."

# रक्कम लंपास केलेल्या चोरट्याला मुरबाड पोलीसांनी ठोकल्या बेड्या!

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुरबाडः**




मुरबाड शहरातील मुख्य बाजारपेठ रस्त्यालगत असलेल्या ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतून रोख रक्कम काढून रस्त्याहून जात असताना एका चोरट्याने त्यांच्या हातातील रोख रक्कम असलेली पिशवी घेऊन पळ काढला मात्र या चोरट्याला मुरबाड पोलिसांनी अवघ्या दोन तासात जेरबंद करून त्याच्याकडून चोरलेली रोख रक्कम हस्तगत करण्यात यश मिळवले.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार धर्मा कृष्णा रांजणे (60) रा. मडकेपाडा, ता. मुरबाड, हे शुक्रवारच्या आठवडे बाजार निमित्ताने कामासाठी ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या खात्यातून रोख रक्कम पन्नास हजार रुपये काढून बैंके बाहेरील पायऱ्यांवरून वरून खाली येत असताना एक अज्ञात इसमाने त्यांना पाठीमागून जोराने धक्का देऊन खाली पाडले व जखमी करुन त्यांचे हातातील पैसे असलेली पिशवी जबरदस्तीने हिसकावून पळ काढला याबाबत धर्मा कृष्णा रांजणे यांनी मुरबाड पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद केला त्यानुसार गुन्हा रजि न 322/2025 भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 309 (6) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असता मुरबाड पोलिसांनी सदर घटनेची गंभीर दखल घेत घटना घडलेल्या परिसरातून सी सी टी व्हि च्या आधाराने संशयित आरोपी पकडला असता त्या आरोपीचे नाव सोपान वामन शेळके रा. आगाशी हल्ली मुक्काम गणेश नगर मुरबाड याला अटक केली असता त्याच्या कडून चोरीची रोख पन्नास हजार रुपये रक्कम हस्तगत केली.

या तपास चक्रात अनिल लाड, उपविभागीय पोलीस अधिकारी, मुरबाड यांनी घटनास्थळी भेट देऊन सदरचा गुन्हा उघडकीस आणणे कामी मार्गदर्शन केले, असता नवनिर्वाचित मुरबाड पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक

दादासाहेब एडके, यांनी पोलीस स्टेशनचे वेगवेगळी पथके तयार करुन सी.सी.टी.व्ही फुटेज ची बारकाईने परिक्षण करुन आरोपीचा मिळालेल्या फोटो नुसार अज्ञात इसम शोधला घेत त्याला जेरबंद केले .

सदर चोरटा हा मुरबाड मधील एका चायनिज दुकानावर काम करत असल्याचे समोर आले आहे. यापूर्वी ही शुक्रवारी आठवडे बाजार असताना अश्या घटना घडल्या आहेत . यावेळी पोलिसांनी दाखवलेल्या सतर्कतेमुळे चोरट्याला जेरबंद करण्यात यश आले आहे.

## वसई - विरार महानगरपालिका क्षेत्रात मीटर आधारित टॅक्सी सेवेसाठी 15 नोव्हेंबरपर्यंत मुदत

### - परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुंबई, दि. १३ :**




वसई - विरार महानगरपालिका क्षेत्रात १५ नोव्हेंबरपर्यंत टॅक्सी, रिक्षा चालकांना मीटरवर आधारित सेवा सुरू करण्यासाठी मुदत देण्यात येत आहे. या क्षेत्रात मीटरवर आधारित टॅक्सी, रिक्षा सेवा १५ नोव्हेंबरपासून सुरू करावी, असे निर्देश परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले. मंत्रालयात वसई - विरार महापालिका क्षेत्रातील वाहतूक कोंडी सोडविण्याबाबत आयोजित बैठकीत मंत्री प्रताप सरनाईक बोलत होते.

बैठकीस आमदार स्नेहा दुबे, एस.टी महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर, वसई - विरार महानगरपालिका आयुक्त मनोज सूर्यवंशी, अपर परिवहन आयुक्त भरत कळसकर आदी उपस्थित होते. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले, वसई - विरार महानगरपालिका क्षेत्रात शेअर टॅक्सी सेवेला परवानगी आहे. टॅक्सी, रिक्षा चालकांनी प्रवाशांची लुबाडणूक करू नये, प्रवाशांच्या तक्रारी आल्यास संबंधितांवर कारवाई करण्यात येईल. वसई - विरार महानगरपालिका क्षेत्रातून महामंडळाने ठाणे, कल्याण मार्गावर लांब पल्ल्याची बस सेवा सुरू करावी. प्रवाशी संख्या लक्षात घेता शहर बस वाहतूक पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करावी. महापालिका क्षेत्रात असलेल्या महामंडळाच्या जागांचा पार्किंग जागांसाठी उपयोग करावा, यासाठी जागा लागल्यास महानगरपालिकेने जागेचे नियोजन करावे, असे निर्देश परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले.

वसई - विरार महानगरपालिका क्षेत्रात असलेल्या विरार, वसई, नालासोपारा येथे बस डेपो सुरू करावेत. नागरिकांना परिवहन सेवा सुलभरित्या मिळावी, याबाबत महानगरपालिकेने कार्यपद्धती ठरवून अंमलबजावणी करावी, असे निर्देशही परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले.

# भिवंडी पंचायत समितीच्या 42 गणांचे आरक्षण जाहीर

## 21 जागा महिलांसाठी राखीव

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**भिवंडी ( शरद भसाळे )**




जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीचे पडघम वाजण्यास सुरुवात झाली आहे.नुकताच ठाणे येथे झालेल्या पंचायत समिती सभापती आरक्षण सोडती मध्ये भिवंडी पंचायत समिती सभापती पद अनुसूचित जमाती महिले साठी राखीव झाल्यानंतर आज सोमवार (१३ ) रोजी शहरातील कामतघर येथील महापालिकेच्या वऱ्हाळ माता मंगल हॉल या ठिकाणी उपविभागीय अधिकारी अमित सानप यांच्या उपस्थितीत तहसीलदार अभिजित खोले यांच्या नेतृत्वा खाली पंचायत समितीच्या ४२ गणांसाठी आरक्षण सोडत पार पडली. यावेळी शिवसेना, भाजप, महाराष्ट्र नवनिर्माण सेना व कॉंग्रेस सह विविध पक्षाचे पदाधिकारी व इच्छुक उमेदवार उमेदवार आरक्षण सोडत पाहण्यासाठी उपस्थित होते.यावेळी मोठी गर्दी झाल्याने विशेष पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. या आरक्षण सोडती मध्ये अनुसूचित जातीसाठी २,अनुसूचित जमाती साठी ८,नागरिकांचा मागास प्रवर्ग साठी ११ व सर्वसाधारण २१ अशा जागा असून यापैकी २१ जागा महिलांसाठी राखीव करण्यात आल्या आहेत. ही आरक्षण सोडत पार पडण्यासाठी निवासी नायब तहसीलदार विशाल इंदुलकर,आदेश म्हात्रे,सहाय्यक महसूल अधिकारी किरण केदार, अतुल नाईक, महसूल सहाय्यक आनंद पवार यांनी विशेष मेहनत घेतली . आरक्षणामध्ये महिलांचा सर्वाधिक समावेश झाल्यामुळे शिवसेना भाजपा सह विविध पक्षाचे पदाधिकारी समाधान दिसत होते त्यामुळे आता निवडणूक प्रचारामध्ये मोठी रणधुमाळी माजण्याची चिन्हे दिसत आहे.

**■ अनुसूचित जमाती ०८**

अकलोली - अनुसूचित जमाती स्त्री
शिरोळे - अनुसूचित जमाती स्त्री
कोलीवली - अनुसूचित जमाती स्त्री
पायगाव - अनुसूचित जमाती स्त्री
गणेशपुरी - अनुसूचित जमाती
मोहंडूळ - अनुसूचित जमाती
अनगाव - अनुसूचित जमाती
कुहे - अनुसूचित जमाती

**■ नागरिकांचा मागास प्रवर्ग ११**

झिडके - नागरिकांचा मागास प्रवर्ग स्त्री
कुरुंद - नागरिकांचा मागास प्रवर्ग स्त्री
शिवनगर - नागरिकांचा मागास प्रवर्ग स्त्री
कवाड खु - नागरिकांचा मागास प्रवर्ग स्त्री
खोणी २ - नागरिकांचा मागास प्रवर्ग स्त्री
कांबे - नागरिकांचा मागास प्रवर्ग स्त्री
पडघा - नागरिकांचा मागास प्रवर्ग
काटई - नागरिकांचा मागास प्रवर्ग
वडुनवघर - नागरिकांचा मागास प्रवर्ग
काल्हेर - नागरिकांचा मागास प्रवर्ग
मानकोली - नागरिकांचा मागास प्रवर्ग

**■ सर्वसाधारण २१**

बोरिवली तर्फे राहूर - सर्वसाधारण स्त्री
भादाणे - सर्वसाधारण स्त्री
आमणे - सर्वसाधारण स्त्री
धामणगाव - सर्वसाधारण स्त्री
दाभाड - सर्वसाधारण स्त्री
खोणी १ - सर्वसाधारण स्त्री
खारबाव - सर्वसाधारण स्त्री
कारिवली - सर्वसाधारण स्त्री
राजनोली - सर्वसाधारण स्त्री
गोवे - सर्वसाधारण स्त्री

**सर्वसाधारण**

| | |
|---|---|
| अंबाडी | चावे |
| महापोली | खोणी ३ |
| राहनाळ | केवणी |
| कशेळी | पुर्णा |
| अंजूर | वेहळे |
| कोन पश्चिम | --- |

**■ अनुसूचित जाती ०२**

कोन पूर्व - अनुसूचित जाती स्त्री
शेलार - अनुसूचित जाती

Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024